REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख मार्च ८, १९४४ अंक १०

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

# विविध माहिती

**पश्चिम आफ्रिकेंतील फौजांचें हिंदुस्थानांत आगमन**

पश्चिम आफ्रिकेंतील सैनिक हिंदुस्थानांत आले आहेत, ते मुख्यतः नैगेरिया, गोल्ड कोस्ट, सिएरा लिओन व गँबिया ह्या वसाहतींतील आहेत आणि त्यांत ख्रिस्ती, मुसलमान व इतर ह्यांचा सारखाच भरणा आहे. आपल्या घरापासून थोडे मैल सुद्धां आजवर दूर न गेलेले त्यांतील बहुसंख्य सैनिक आहेत व त्यांनीं ॲबिसिनियाच्या लढाईत भाग घेतलेला आहे.

**म्हैसूर संस्थानांत शेतीचीं स्वस्त अवजारें**

शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांच्या चाकांच्या धावा, बैलांच्या पायाचे नाल, नांगर, कोयते, इत्यादींसाठी म्हैसूर सरकारनें गेल्या वर्षात १,५०० टन लोखंड उपयोगांत आणलें व आणखी तितकेंच लोखंड त्यासाठी उपलब्ध केलें आहे, त्यामुळें शेतकऱ्यांना ह्या वस्तू बाजार-भावाच्या एक तृतीयांश किंमतीस पडतात. येत्या आठ महिन्यांत सर्वेण्यासाठी म्हैसूर सरकारनें ७ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. ह्या कार्यक्रमांत ४ हजार नांगर, नांगरांचे १½ लक्ष फाळ, चाकांच्या २० हजार धावा, ५ लक्ष नाल व २ हजार गाड्या तयार करण्यासाठी ४६ हजार घनफूट लांकूड ह्यांची व्यवस्था केलेली आहे.

**शेतकऱ्यांच्या इंजनांसाठी व पंपासाठी क्रूड ऑइल**

शेतीसाठी उपयोगांत येत असलेल्या ऑइल इंजनांस व पंपांस लागणारें क्रूड ऑइल शेतकऱ्यांस त्यांच्या १९४१ मधील खरेदीच्या ७५% प्रमाणांत मिळण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केलेली आहे. १९४१ नंतर ज्यांची इंजनांची खरेदी आहे किंवा त्या वर्षी ज्यांचीं इंजनें सतत चालू नव्हतीं, अशांनीं ठराविक तेलाच्या खरेदीच्या परवान्यासाठी कंट्रोलर ऑफ ऑइल सप्लाइज, मुंबई, ह्यांचेकडे अर्ज करावा.

**फळांची प्रतवार लावण्याची व्यवस्था**

मुंबई प्रांतांत राहुरी (अहमदनगर जिल्हा) व सासवड (पुणें जिल्हा) येथें ॲगमार्क योजनेप्रमाणें फळांची प्रतवार लावण्याची व्यवस्था आहे. पूर्व खानदेश जिल्ह्यांतहि संत्रीं व मोसंबी ह्यांची प्रतवार लावण्यांत येते. ह्या सर्व ठिकाणीं कित्येकांना अशी प्रतवार लावण्याचा परवाना दिलेला आहे. सहा महिन्यांत १½ लक्ष फळांची ह्या पद्धतीनें प्रतवार लावली गेली, त्याचा फायदा शेतकऱ्यांस फळांची किंमत चांगली येण्यांत झाला. हापूस आंब्यांची प्रतवार लावल्यास मुंबईच्या बाजारांत त्यांचा उत्तम भाव मिळूं शकतो. ज्यांना प्रतवार लावण्याच्या परवान्याचा दाखला पाहिजे असेल, अशांनीं चीफ मार्केटिंग ऑफिसर, मुंबई, ह्यांचेकडून अर्जाचा नमुना मागवून घ्यावा. सहकारी खात्याच्या मार्केटिंग विभागामार्फत प्रतवार लावण्याचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे.

**हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न-खर्च!**

एप्रिल ते डिसेंबर, १९४३ ह्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नापेक्षा १०६½ कोटि रुपये अधिक खर्च केला. ह्या मुदतींत सरकारच्या कर्जांत १५२ कोटि रुपयांची भर पडली.

**हिंदी रेल्वेजवरील अधिकारी**

हिंदुस्थान सरकारच्या रेल्वेजवरील ६७ हजार नेमणुकांपैकी १,११२ अधिकारी आहेत. त्यांपैकीं ३९३ युरोपियन आहेत. युद्धजन्य वाढत्या कामासाठीं रेल्वेजवर ५४१ तात्पुरत्या अधिकाऱ्यांच्या जागा निर्माण करण्यांत आल्या, त्यांपैकीं १०० जागांवर पेन्शनींत निघणाऱ्या जुन्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली व ३७१ अधिकाऱ्यांस बढती मिळाली. नोकरीची मुदत वाढवून मिळालेल्या १०० अधिकाऱ्यांपैकीं ४५ युरोपियन आहेत.

**सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.**

वरील बँकेस ३० जून, १९४३ अखेरच्या वर्षी ३,५८१ रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारांस दरसाल ८% डिव्हिडंड मिळालें. बँकेकडे २४½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत, त्यांतील १५½ लक्ष रुपये मुदतबंद ठेवींत आहेत. रिझर्व्ह फंडाचा आंकडा आतां ४४½ हजार रुपये झाला आहे. बँकेनें १४½ लक्ष रुपये रोख्यांत व १०½ लक्ष रुपये कर्जांत गुंतविलेले आहेत. श्री. वा. ग. चिरमुले ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेची प्रगति होत आहे.

**जनावरांची शिरगणति**

मुंबई शहरांतील बैल, गाई, म्हशी, वासरें, मेंढ्या, बकऱ्या, इत्यादींच्या शिरगणतीचें काम चालू आहे.

**अमेरिकन सैनिकांची हानि**

चालू युद्धांतील अमेरिकन सैनिकांच्या हानीच्या ताज्या आकड्यांप्रमाणें, आतांपर्यंत १,५७,८६५ सैनिक कामास आले आहेत. त्यांपैकीं ३९,००५ मृत, ५४,८६७ जखमी, ३५,८३० बेपत्ता व ३१,१६३ युद्धकैदी आहेत.

**प्रवासी आकर्षण्याचा धंदा**

ग्रेट ब्रिटनमध्यें बाहेरील देशांतील प्रवासी आकर्षून, त्यांना ग्रेट ब्रिटनमध्यें पैसे खर्च करण्यास लावण्याचा व त्यामार्गानें ग्रेट ब्रिटनची अदृश्य निर्गत वाढविण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची आवश्यकता ट्रॅव्हल असोसिएशनचे अध्यक्ष, सर डग्लस हॅकिंग, ह्यांनीं लंडनमध्यें प्रतिपादन केली. कोळशाच्या युद्धपूर्व निर्गतीची बरोबरी हा अदृश्य निर्गत व्यापार करूं शकेल, असें ते म्हणाले.

**ग्रेट ब्रिटनवरील बॉम्ब हल्ल्यांतील मनुष्य हानी**

| | मृत | जखमी होऊन इस्पितळांत दाखल | एकूण मृत्यू व जबर दुखापत झालेले |
|---|---|---|---|
| सप्टें. १९३९ ते ऑग. १९४० | १,४९४ | १,९८० | ३,४७४ |
| सप्टें-डिसें. १९४० | २२,२८२ | २८,५२२ | ५०,८०४ |
| १९४१ | २०,८६३ | २१,८३९ | ४२,७०२ |
| १९४२ | ३,२२१ | ४,१४९ | ७,३७० |
| १९४३:— | | | |
| जाने.-जून | १,८३० | २,५१५ | ४,३४५ |
| जुलै | १६७ | २१० | ३७७ |
| ऑगस्ट | १०८ | १६४ | २७२ |
| सप्टें. | ५ | ११ | १६ |
| ऑक्टो. | ११८ | २८३ | ४०१ |
| | ५०,०८८ | ५९,६७३ | १,०९,७६१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ७४ | कर-नवीन करांविषयीं लोकमत-धान्यपुरवठ्याच्या वाढीसाठीं शेतकऱ्यांस मदत-प्राप्तीवरील कराचें काम-... यांत दुरुस्ती ... | ७८ |
| २ मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक ... | ७५ | ६ भाजीपाल्याची लागवड | ७८ |
| ३ बॅंकव्यवहारांच्या धंद्याचें ... नियंत्रण | ७६ | ७ दुष्काळजन्य रोगांवर उपाय | ७९ |
| ४ श्रीज्ञानेश्वरी कथामृत ... | ७६ | ८ हिंदी रेल्वेजचें वाढतें ... उत्पन्न | ७९ |
| ५ स्फुटविचार ... धान्य नियमनाविषयीं... प्रांतिक सरकारचें धोरण—२३½ कोटि रुपयांचे नवीन | ७७ | | |


# अर्थ

बुधवार, ता. ८ मार्च, १९४४

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांनीं १९४४–४५ सालाबाबतचें आपलें अंदाजपत्रक मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलें अाणि त्याच्या स्पष्टीकरणार्थ विस्तृत भाषण केलें. वाढता खर्च, उत्पन्नांत त्याच्या मानानें येणारी तूट, ती भरून काढण्यासाठी सुचवलेली करवाढ व शिल्लक तुटीची कर्जाच्या मार्गानें भरपाई हीं युद्धकालीन सरकारी उत्पन्न-खर्चाच्या परिस्थितीचीं लक्षणें त्यांत उत्कट रीतीनें प्रतीत होतीं. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चाच्या १९४४-४५ सालाविषयींच्या अपेक्षा काय आहेत आणि त्यांचेसंबंधांत फडनवीसांच्या योजना कोणत्या आहेत-ह्याचें दिग्दर्शन करण्यापूर्वी मागील व चालू वर्षातल्या जमा-खर्चाच्या स्थितीची कल्पना येणें आवश्यक आहे. १९४२-४३ सालीं फेर अंदाजपत्रकाप्रमाणें ९४ कोटि रुपयांची तूट येईल असें वाटत होतें, पण पक्के हिशेब पुरे झाल्यावर हा आकडा प्रत्यक्ष रीतीनें ११२ कोटि रुपयांवर गेलेला दिसून आला. चालू सालीं म्हणजे १९४३-४४ मध्यें उत्पन्न २५४ कोटि रुपये होईल म्हणजे मूळ अंदाजपत्रकाच्या पेक्षा ३५ कोटींनीं अधिक होईल असा अंदाज आहे. परंतु खर्चात ८७ कोटींचा वाढावा होऊन असेर ९२ कोटींची तूट येईल असा आजचा अजमास आहे. सरकारी खर्चाची रकम वाढत्या लष्करी खर्चानें फुगली आहे हें सांगावयास नको. चालू सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकाप्रमाणें मामुली व भांडवली लष्करी खर्च अनुक्रमें २६२ व २८ कोटि असा होईल. वाढलेले बाजारभाव, लष्कराचा विस्तार इत्यादि कारणांमुळें खर्चाचें हें प्रमाण वर गेलें आहे. बिनलष्करी खर्चातहि सुमारें ८ कोटींची वाढ झालेली दुरुस्त अंदाजपत्रकांत दिसते. निर्वासितांसाठीं दोन कोटि रुपये, अधिक धान्य पिकवण्याविषयींच्या प्रयत्नास उत्तेजन म्हणून प्रांतिक व संस्थानी सरकारांस मदतीसाठीं दोन कोटि, बंगालमधील दुष्काळग्रस्तांप्रीत्यर्थ तीन कोटि रुपये हीं खर्चातील वाढीचीं कारणें आहेत. रेल्वेज व लष्कर ह्यांचेशिवाय इतर मध्यवर्ती सरकारी नोकरांस वाढत्या महागाई भत्त्याकरितां सवा दोन कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

ही पार्श्वभूमि लक्षांत घेऊन १९४४-४५ सालांतील उत्पन्न-खर्चाचा अंदाज काय आहे तो आतां पाहूं. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजपत्रकांतील उत्पन्नापेक्षा येत्या वर्षातलें उत्पन्न ३० कोटि रुपयांनीं अधिक धरलें आहे. व्यापारी जहाजें वाढून माल आणण्यास उपलब्ध होऊं शकतील ह्या अपेक्षेनें आयात जकातीचें उत्पन्न सुमारें एक कोटि रुपयांनीं अधिक होईल अशी आशा आहे. एक्साइजच्या उत्पन्नांत सवा कोटि रुपयांची वाढ होईल आणि तंबाखूवरची पट्टी ९ कोटींच्या ऐवजी १०½ कोटि रुपये होईल असा अजमास आहे. प्राप्तीवरील करांचें उत्पन्न (फाजील नफ्याचे ७८ कोटि धरून) १७४ कोटि धरण्यांत आलें आहे आणि प्रांतिक सरकारांचा ह्या करांतील हिस्सा २३ कोटि रुपयांच्या वर होईल. पोस्ट व तारखात्याच्या उत्पन्नाचा अंदाज ११ कोटि रुपये आहे. खर्चाच्या बाजूकडे वळल्यास लष्करी खर्चास पहिलें स्थान आहे असें आढळतें. त्याची रकम २७६ कोटि रुपये असून त्याशिवाय सुमारें २५ कोटींचा भांडवली खर्च वेगळा आहे. बिनलष्करी खर्चात ह्या मानानें केवळ अल्पवाढ आहे. वरील सर्व आकडे एकत्र केले असतां १९४४।४५ च्या अंदाजपत्रकांतील उत्पन्न-खर्च ठळकपणानें खालीं दिल्याप्रमाणें होईल.

| | (कोटि रुपये) |
|---|---|
| लष्करी खर्च | २७६·६ |
| बिनलष्करी खर्च | ८६·६ |
| एकूण | ३६३·२ |
| चालू करांच्या आधारानें उत्पन्न | २८४·९ |
| तूट | ७८·२ |

ही सबंद अपेक्षित तूट जुने कर वाढवून किंवा नवीन कर बसवून नाहींशी करतां येणें शक्य नाहीं, ह्याची जाणीव फडनविसांस आहे. तथापि, ती सर्वस्वी कर्जानें भरून काढणें इष्ट नसून शक्य तितकें करांचें उत्पन्न वाढवणें आवश्यक वाटून त्यांनीं त्यासंबंधांतल्या योजना अंदाजपत्रकांत दाखल केल्या आहेत. हिंदुस्थान सरकारास सध्याच्या युद्धपरिस्थितींत आपला लष्करी व बिनलष्करी खर्च भागवण्यासाठी पैसा उभा करावा लागत आहे त्याचप्रमाणें ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारांस ह्या देशांत खर्चाव्या लागणाऱ्या पैशाचाहि पुरवठा तात्पुरता करणें जरूर झालें आहे. ह्या दुहेरी कामाकरितां चलनवृद्धि होत आहे आणि तिचे योगानें महागाई पसरली आहे. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठीं सरकार अनेक उपाय योजीत आहे आणि जनतेच्या पैशाचा ओघ स्वतःच्या तिजोरीकडे खेचीत आहे. करवाढ हा त्यांपैकीं एक मार्ग आहे आणि १९४४-४५ सालीं त्यांत सरकारला २३½ कोटि रुपयांचें अधिक उत्पन्न होईल असा अंदाज आहे. अपेक्षित तूट एवढ्या रकमेनें कमी होईल आणि बाकीची कर्जाच्या द्वारानें नाहींशी केली जाईल. रेल्वेजच्या दरांत वाढ, सक्तीच्या व खुषीच्या ठेवींच्या सरकारकडे ठेवी, भावनियंत्रण इत्यादि साधनांनीं एकूण खर्चाला आवरणारा पैसा, आणि तिजोरींत येणारा पैसा ह्यांची बरोबरी तोंडमिळवणी होऊन चलनविस्तारास आळा बसेल अशी आशा फडनविसांनीं व्यक्त केली आहे. प्राप्तीवरील कर, त्यास पात्र असलेल्या लोकांनीं

अगाऊ ठेव म्हणून सरकारी तिजोरींत भरण्याची योजना त्यांनीं आंखली असून ती अमलांत आणण्याचें ठरवलें आहे. विशिष्ट मर्यादेवरच्या मालीवरील कराच्या दरांत आणि तंबाखूवरच्या पद्धतींत वाढ आणि सुपारी, चहा व कॉफी ह्यांचे वर नवीन पट्टी ह्या करांचें उत्पन्न वाढवण्याच्या हेतूनें या बाबी अमलांत यावयाच्या आहेत. सुमारें २१ कोटि रु. जादा उत्पन्न देणाऱ्या करांच्या ह्या बाबींची चर्चा स्फुट विचारांत आम्हीं आजच्या अंकांत केली आहे.

## ॲक्चुअरीच्या धंद्याचें नियंत्रण

### विमा कायद्याखालील नियमांत दुरुस्ती

हिंदी विमा कायद्याच्या ११४ व्या कलमानें हिंदुस्थान सरकारला विमा कायद्याचा उद्देश पार पाडण्याचे दृष्टीनें योग्य वाटतील ते नियम करण्याचा अधिकार दिलेला आहे. १९३९ च्या विमाविषयक नियमांत सरकारनें आतां कांहीं दुरुस्ती सुचविली आहे, ती ११४ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, १९ फेब्रुवारीच्या सरकारी गॅझिटांत जाहीर करण्यांत आली आहे. ह्या दुरुस्तीच्या मसुद्यासंबंधीं कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास, त्या सरकारकडे २० मार्चपूर्वी पोचल्या पाहिजेत.

### सध्याचा व नवा नियम

'विमा कायद्यांत वर्णिलेला ॲक्चुअरी हा (१) इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीज लंडन अथवा स्कॉटलंडमधील फॅकल्टी ऑफ ॲक्चुअरीज ह्यांचा फेलो किंवा (२) ज्याला सध्या नियमान्वयें सर्टिफिकेट देण्यांत आलें आहे असा वरील इन्स्टिट्यूट अथवा फॅकल्टीचा असोसिएट किंवा ॲक्चुअरीचे ज्ञान असलेला मनुष्य ह्यासच विमाकायद्यानें ॲक्चुअरी म्हणून मान्यता दिलेली आहे. सर्टिफिकेट मागतांना अर्जदारानें (असोसिएट किंवा इतर कोणीहि) आपली लायकी नमूद करावी लागते व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला ती पटली तर तो त्याप्रमाणें सर्टिफिकेट देतो.

सुचविण्यांत आलेला नियम खालीलप्रमाणें आहे:—"इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीज, लंडन किंवा स्कॉटलंडमधील फॅकल्टी ऑफ ॲक्चुअरीज ह्यांचा फेलो हा ॲक्चुअरीचें काम करूं शकेल. तथापि, एकाद्या विमाकंपनीनें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे अर्ज करून वरील संस्थांपैकीं एकादीचा असोसिएट किंवा दुसरा कोणीहि लायक इसम ह्यांची ॲक्चुअरी म्हणून नेमणूक केल्याखेरीज त्या कंपनीस कायद्याचीं बंधनें पाळतां येणार नाहींत असें सुपरिंटेंडेंटला पटवून दिलें, तर तो अशा अर्जाचा विचार करून विशिष्ट परिस्थितीपुरती त्या असोसिएटला किंवा इसमाला योग्य त्या अटीवर ॲक्चुअरी म्हणून सही करण्यास परवानगी देईल".

### फेलो व असोसिएट ह्यांतील भेद

ह्यापुढें विमाकंपन्यांची ॲक्चुअरीचीं कामें शक्यतोंवर फेलोजकडूनच करविलीं जावीं, असा सरकारचा आग्रह आहे आणि फेलोज मिळूं शकले नाहींत, तरच तेवढ्यापुरती असोसिएटसना सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सच्या मर्जीनुरूप परवानगी मिळावी, असा ह्या दुरुस्तीचा स्पष्ट अर्थ आहे. फेलोज व असोसिएट्स ह्यांमध्यें भेद करून, असोसिएटसची लायकी आतां इतकी का कमी ठरविण्यांत आली आहे, हें समजत नाहीं. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें असा भेदाभेद नाहीं, असें समजतें. हिंदुस्थानांत फक्त १३ फेलोज आहेत, त्यांपैकीं ९ फेलोज सरकारी नोकरींत आहेत. फक्त दोघेजण ॲक्चुअरीचा स्वतंत्र धंदा करीत असून बाकीचे विमा कंपन्यांतच नोकरीवर आहेत. एका कंपनींतील नोकर-ॲक्चुअरीनें दुसऱ्या कंपन्यांचें मूल्यमापन करणें कितपत इष्ट व शक्य होईल, हा प्रश्नच आहे. अशा परिस्थितींत, निदान कांहीं किमान अनुभवाच्या असोसिएटला तरी फेलोचे अधिकार देणें योग्य आहे. नवीन नियम अमलांत आल्यामुळें, कित्येक नामवंत व अनुभवी हिंदी विमागणितज्ञांना सुद्धां आपला ॲक्चुअरीचा धंदा पूर्वीप्रमाणें चालवितां येणें अशक्य होणार आहे. पूर्वी असोसिएटला स्वतः अर्ज करतां येत असे. नव्या नियमानुसार विमाकंपनीसच फक्त ह्यासंबंधांत अर्ज करतां येईल. असोसिएट असलेल्या ॲक्चुअरींच्या कामाबद्दल सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची तक्रार आहे, असें मानलें तरी फेलोजनीं केलेलें मूल्यमापन त्यास समाधानकारक वाटेलच, अशी तरी खात्री कोठें आहे? मूल्यमापनासंबंधीं कडक नियम घालून देऊन ते पाळावयास लावण्याचा अधिकार सुपरिंटेंडेंटला असतांना, आतांपर्यंत ॲक्चुअरीचा धंदा करीत आलेल्या असोसिएटसवर राग काढण्याचें प्रयोजन समजत नाहीं.

## " श्रीज्ञानेश्वरी–कथामृत "

### तृतीय खंड

(श्री. शं. दी. करंदीकर, २११, चर्नी रोड, मुंबई ४, किं. २ रु.)

ज्ञानेश्वरीचें आकलन सामान्य बुद्धीच्या मराठी वाचकांस व्हावें ह्या हेतूनें ग्रंथकारानें तिचें सुलभ आणि रसाळ स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न चालवला आहे व त्याचा हा तिसरा हप्ता आहे व त्यांत गीतेच्या सहाव्या अध्यायाची मजल मारली आहे. श्री. करंदीकरांच्या कार्यास जनतेचा वाढता पाठिंबा मिळत असून श्रीज्ञानेश्वरी–कथामृताचें रूपांतर हिंदी, गुजराथी व इंग्रजी भाषांत होत आहे ही गोष्ट समाधानकारक व अभिनंदनीय आहे. त्यांच्या उद्योगाच्या उपयुक्ततेचा व लोकप्रियतेचा हा उत्कृष्ट पुरावा आहे. पहिल्या दोन खंडांप्रमाणें प्रस्तुत तृतीय खंड चटकदार झाला आहे आणि पुढील खंडाच्या प्रसिद्धीस ग्रंथकर्त्यांस आवश्यक तें सहाय मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

### अंदाजपत्रकांतील तुटीचे मध्य आकडे

(कोटि रुपयांचे आकडे)

| | १९४३-४४ अंदाज | १९४३-४४ दुरुस्त अंदाज | १९४४-४५ अंदाज |
|---|---|---|---|
| उत्पन्न | १९९.३० | २५४.५० | २८४.९७ |
| खर्च | २५९.५९ | ३४६.९३ | ३६३.१८ |
| तूट | ६०.२९ | ९२.४३ | ७८.२१ |

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| सप्टेंबर ते डिसेंबर | गांठी |
|---|---|
| १९४३ | १३,१०,४८४ |
| १९४४ | १४,२४,०३८ |

# स्फुट विचार

## धान्य-नियमनाविषयीं प्रांतिक सरकारचें धोरण

मुंबई प्रांत धान्य पुरवठ्याचे बाबतींत तुटीचा असल्या कारणानें गेल्या खरीप पिकांचें नियमन करून त्याची वांटणी व किंमत मर्यादित व्हावी म्हणून एक योजना अमलांत आणली होती. उत्पादकांकडून त्यांच्या पिकाचा नियमित भाग आपल्या ताब्यांत घेऊन धान्याचा पुरवठा व विक्री ठराविक दरानें करण्याची व्यवस्था सरकारनें केली होती आणि ती निरनिराळ्या जिल्ह्यांत अधिकाऱ्यांच्या विद्यमानें अमलांत आणली गेली. पण ती अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाली नाहीं असें प्रांतिक सरकाराच्या वतीनें आतां सांगण्यांत आलें आहे. खरीपाच्या संबंधानें आलेल्या अनुभवापासून बोध घेऊन रब्बीच्या पिकांचें नियमन करण्याची सुधारलेली योजना सरकारनें आखल्याचें जाहीर झालें आहे. धान्याच्या किंमती व वांटणी हीं परिणामकारक होण्यास तें जमा करण्याची व विक्रीची कार्यक्षम व्यवस्था सरकारच्या अधिकारांत झाली पाहिजे. मोठ्या शेतकऱ्यांकडून ठराविक प्रमाणांत धान्य घेऊन त्याची विक्री स्वतःच्या अधिकारानें व ठराविक लोकांच्या व दुकानांच्या मार्फत सरकारनें करणें आवश्यक आहे. धान्याची खरेदी–विक्री व त्याच्या किंमती ह्यांचें नियंत्रण बिनचूक झाल्याखेरीज तुटीच्या भागांस धान्य योग्य भावानें पुरवणें शक्य होणार नाहीं ही गोष्ट सरकारच्या ध्यानांत आली असून त्याप्रमाणें त्यानें योजना अमलांत आणण्याचें ठरवलें आहे. खरीप पिकाच्या बाबतींतल्या योजनेच्या अंमलबजावणीविषयीं तक्रारी अनेक ठिकाणांहून सरकारच्या कानांवर घालण्यांत आल्या आहेत. ह्यापुढें तसल्या तक्रारींना जागा रहातां कामा नये.

---

## २३½ कोटि रुपयांचे नवीन कर

हिंदुस्थान सरकारास १९४४-४५ मध्यें ७८ कोटि, २१ लक्ष रुपये तूट येणार आहे, अशी अंदाजपत्रकांतील अपेक्षा आहे. त्यापैकीं २३½ कोटि रुपयांची भरपाई नव्या करांचे वसुलीनें करण्यांत येणार आहे. सुपारी, कॉफी व चहा ह्यांवर प्रत्येक पौंडामागें २ आणे एक्साइज पट्टी बसविण्यांत येणार आहे. सुपारीच्या पट्टीचे २ कोटि व चहाकॉफीच्या पट्टीचे २ कोटि, मिळून एकूण ४ कोटि रुपयांचें उत्पन्न होईल. इन्कमटॅक्समधील वाढ १५ हजार रुपयांच्या वरील उत्पन्नास लागू पडणार आहे व कंपन्यांसहि जास्त टॅक्स भरावा लागणार आहे. कस्टम्स ड्यूटीजवरील सरचार्ज कायम रहाणार असून तंबाखूवरील करांतील वाढ आणखी १० कोटींची भर करणार आहे. बिगर-शेतकी वारसावरील करांमुळें प्रांतिक सरकारांचें उत्पन्न वाढेल, ह्या दृष्टीनें त्या कराची योजना पुढें करण्यांत यावयाची आहे. आयुर्विमा कंपन्यांवरील इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स ह्यांची एकूण आकारणी रुपयांत ६३ पै पेक्षा अधिक होऊं नये, अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे. जादा नफ्यावरील कर देणारांच्या सक्तीच्या डिपॉझिटची रक्कम वाढविण्यांत आली आहे. इनकमटॅक्स तिमाही हप्त्यांनीं आगाऊ वसूल होण्यास प्रोत्साहन मिळेल, अशी व्यवस्था सुचविलेली आहे. नवीन कर्जाच्या बाबींमुळें, सरकारच्या अंदाजपत्रकांतील तुटीचा आकडा २३½ कोटि रुपयांनीं कमी होऊन अपेक्षित निव्वळ तूट ५४ कोटि, ७१ लक्ष रुपयांवर येईल. नवीन कर, रेल्वेजच्या दरांतील वाढ व सक्तीचीं डिपॉझिटस, ह्यांचेमुळें १०० कोटि रुपये व्यवहारांतून बाहेर काढले जातील व त्यामुळें चलनवृद्धीस आळा बसण्यास सहाय होईल, अशी अपेक्षा सरकारी फडनवीसांनीं व्यक्त केली.

---

## नवीन करांविषयीं लोकमत

सर जेरेमी रेस्मन ह्यांच्या करवाढीच्या योजनेवर निरनिराळ्या वर्गांच्या प्रतिनिधींची टीका प्रसिद्ध झाली आहे ती बरीचशी प्रतिकूल आहे. तंबाखू व चहा ह्या गरीब लोकांच्या जरूरीच्या जिनसा नवीन पट्टीमुळें अधिक महाग होतील म्हणून त्या करांचा निषेध करण्यांत आला आहे. ह्या टीकाकारांत कामगार वर्गाचे प्रतिनिधी आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. प्राप्तीवरील कर आणि कंपन्यांकडून घेण्यांत येणारा उत्पन्नावरील कर ह्यांत वाढ सरकारच्या फडनवीसांनीं सुचवली आहे तिचे विरुद्ध धंदेवाले व कारखानदार ह्यांनीं जोराचा अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानच्या आर्थिक सामर्थ्याचे मानानें करांचें ओझें जबर झालें आणि ह्यासंबंधांत इंग्लंडच्या करपद्धतीशीं तुलना करण्यांत कांहीं हंशील नाहीं. लष्करी खर्चाची वाटणी इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांमध्यें केली जात आहे. तीमध्यें बदल होऊन ह्या देशावरचें खर्चाचें ओझें कमी करण्यांत आलें पाहिजे असें टीकाकारांचें म्हणणें आहे. युद्धपरिस्थितीमुळें सर्वच उद्योगधंद्यांस जादा फायदा होत आहे असें नसून वाढत्या प्राप्तीवरील कराचा बोजा मात्र सर्वांस सारखाच सहन करावा लागणार आहे, अशी धंदेवाल्यांची टीका आहे. जादा कर आणि सरकारकडे आकर्षल्या जाणाऱ्या ठेवी ह्यांच्या मार्गानें चलनविस्तारास आळा घालण्याचा फडनविसांचा उद्देश आहे तो सफल होण्यास लष्करी खर्च मर्यादित करणें आणि मालाच्या उत्पादनास ह्या देशांत उत्तेजन देऊन त्याच्या किंमती उतरवणें हे उपाय सुचवण्यांत आले आहेत.

---

## धान्यपुरवठ्याच्या वाढीसाठीं शेतकऱ्यांस मदत

चलनाचा पुरवठा मर्यादित करून महागाईस आळा घालणें आणि देशांत धान्याचें उत्पादन वाढवणें. हे दोन उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न सरकारनें चालवला आहे. ह्या धोरणास अनुसरून मध्यवर्ती असेंब्लीमध्यें श्री. देशमुख ह्यांनीं एक ठराव पुढें मांडून सरकारनें दहा कोटि रुपयांचें खास कर्ज काढावें आणि त्या पैशाचा विनियोग अधिक धान्य पिकवण्यास शेतकऱ्यांस द्रव्यसहाय देण्याकडे करावा असें सुचवलें. हा प्रश्न प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या कक्षेंतील असला तरी हिंदुस्थान सरकार तो सोडवण्याचे कामीं त्यांस आवश्यक ती मदत करीत आहे आणि त्यासंबंधांत कोणतीच अडचण भासलेली नाहीं किंवा तक्रार करण्यांत आलेली नाहीं असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. ठरावाच्या दुहेरी हेतूविषयीं आपणांस पूर्ण सहानुभूति आहे, तथापि कर्ज व त्याचा सुचवलेला विनियोग ह्यांची पद्धति आपणांस मान्य नाहीं असें फडनवीस सर जेरेमी रेस्मन म्हणाले. विशिष्ट कामासाठीं कर्ज काढणें आणि त्याचा पैसा त्यांकरिता उपयोगांत आणणें हा मोठी सरकारच्या मामुली पद्धतीस धरून नाहींत असा मुद्दा त्यांनीं पुढें मांडला. निरनिराळ्या द्वारांनीं तिजोरींत येणारा पैसा एकत्र केला जातो आणि सरकारास जरूर वाटणारा सर्व खर्च त्यामधून होत असतो; अमक्या बाबीवर खर्चाकरतां अमके

रकम असें विशिष्टीकरण तिजोरीच्या मामुली पद्धतींत नसतें अशा विचारसरणीचा त्यांनीं अवलंब केला. सरकार ठरावाशीं सहमत असल्यानें आणि तें शेतकऱ्यांस अनेक रीतींनीं सहाय देत असल्यानें श्री. देशमुख ह्यांनीं आपली सूचना परत घ्यावी असें त्यांनीं सांगितलें. परंतु ठरावास असेंब्लींतल्या बहुमताचा पाठिंबा आहे असें दिसून आल्यावरून सरकारनें मतनोंदणीचा आग्रह धरला नाहीं आणि श्री. देशमुख ह्यांची सूचना मान्य झाली. ठरावाची अंमलबजावणी सरकार कशी करतें तें पहावें.

### प्राप्तीवरील कराचे कायद्यांत दुरुस्ती

लोकांना विम्याच्या स्वरूपांत पैशाची बचत करण्यास प्रोत्साहन मिळावें, ह्या दृष्टीनें त्यांनीं विमा कंपनीस भरलेल्या हप्त्यांवर ( ही हप्त्याची रकम त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या ½ पेक्षा जास्त नसेल तर ) प्राप्तीवरील कराची माफी देण्यांत यावी, असा इनकमटॅक्सचा कायदा आहे. परंतु, कित्येक लोक केवळ इनकमटॅक्स टाळण्यासाठीं एक किंवा दोन वर्षे मुदतीचे विमे उतरतात व त्यांवरील हप्ते करमाफ असतात, त्याचा कायदेशीर पण अवास्तव फायदा घेतात. विमा कंपनींत विमा उतरून, हप्त्यांच्या ९०% ते ९५% इतकी त्यांची सोडकिंमत घ्यावयाची म्हणजे भारी कराऐवजीं ५% किंवा १०% इतक्याच रकमेची तूट सोसावयाची असा हा व्यवहार असतो. अशा तऱ्हेचे विमे सध्या, इनकमटॅक्सच्या चढीच्या दराचे काळांत, विशेष लोकप्रिय झालेले आहेत व कित्येक विमा कंपन्या अशा फायदेशीर विम्यांचा प्रसार करण्याची खटपटहि करीत असतात. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठीं, प्राप्तीवरील कराच्या माफीस पात्र असलेलें उत्पन्न सध्यां एकूण उत्पन्नाच्या ½ इतकें आहे त्याऐवजीं ते व्यक्तींच्या एकूण उत्पन्नाच्या ७% इतकें करण्यांत यावें, अशी इनकमटॅक्स कायद्यांत दुरुस्ती सुचविणारें बिल सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं असेंब्लींत नुकतेंच मांडलें. विमा पॉलिसी सुमारें १३ वर्षे चालू असली, तरच नव्या नियमाचा तिला फायदा मिळूं शकेल व त्यामुळें कराची माफी देण्याचा मूळ उद्देश पूर्णपणें सफळ होणार नाहीं, अशी श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं तक्रार केली. फडनविसांनीं सिलेक्ट कमिटींत तिचा विचार करण्याचें मान्य केलें. प्राप्तीवरील कर त्रैमासिक हप्त्यांनीं आगाऊ भरणारास, ह्या रकमांवर २% व्याज यावें, अशी दुसरी एक दुरुस्तीहि इनकमटॅक्स कायद्यांत सुचविण्यांत आली आहे. मागील सालांतील कराची आकारणी लक्षांत घेऊन किंवा नव्या आकारणीसंबंधीं स्वतःच्या कल्पनेनें हे आगाऊ हप्ते भरले जातील, परंतु हा अंदाज प्रत्यक्ष आकारणीचे मानानें ८०% इतका बरोबर आला नाहीं, तर जेवढी रकम कमी भरली जाईल, तिचेवर ६% व्याज दंडादाखल आकारलें जाईल.

### प्राप्तीवरील कराचे सुचविलेले नवे दर

( १ ) दोन हजारांखालील उत्पन्नावर कर नाहीं. ( २ ) पहिले ७५० रुपयांचें उत्पन्न वगळून १,५०१ ते २,००० रुपये ह्यामधील उत्पन्नावर गेल्या वर्षी रुपयास ६ पै अशी पट्टी बसविली होती, ती काढून टाकण्यांत येत आहे. ( ३ ) दोन ते दहा हजारांमधील उत्पन्नावरील करांत बदल नाहीं. ( ४ ) दहा हजारांवरील उत्पन्नावरील कर वाढविण्यांत आला आहे.

| उत्पन्नाचा टप्पा रु. | मूळ दर | सध्याचा सरचार्ज | सुचविले. सरचार्ज | सध्याच्या करांत वाढ | कराची आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| पहिले १,५८० | ... | ... | ... | ... | ... |
| पुढील ३,५०० | ९पै | ६पै | ६पै | ... | २७३-७ |
| पुढील ५,००० | १आ.३पै | १०पै | १०पै | ... | ६५१-१ |
| पुढील ५,००० | २आ. | १आ.४पै | १आ.६पै | २पै | १,०९३-१२ |
| पुढील उत्पन्न | २आ.६पै | १आ.८पै | २आ. | ४पै | ... |

### लहान जागेंत घराचे आवारांत भाजीपाल्याची लागवड

मोठमोठ्या शहरांत शिधापद्धति सुरू झाल्यापासून नेहमींप्रमाणें भरपूर अन्न मिळेनासें झालें आहे. शिवाय मिळणारें अन्न सर्वांचे प्रकृतीस मानवणारेंच असतें असें नाहीं. अशा परिस्थितींत लोकांचें आरोग्य बिघडून रोगराई सुरू होण्याची मोठीच भीति आहे. ह्यावर लोकांचे हातीं असलेला एक उपाय म्हणजे नियंत्रण नसलेल्या पदार्थांचें सेवन करून प्रस्तुत प्रसंगास तोंड देणें हें होय. प्रत्येकाच्या आहारांत भरपूर भाजीपाला असल्यास त्यामुळें आरोग्य उत्तम राहण्याकरितां लागणारीं उपयुक्त जीवनसत्वें व क्षार ह्यांचा पुरवठा होऊन पोट भरण्यासहि मदत होते असें अलीकडील शोधामुळें सिद्ध झालें आहे. परंतु सर्व भाजीपाल्यावर नियंत्रण नसलें तरी त्यांच्या किंमती गरीब व मध्यम लोकांच्या शक्तीबाहेर गेल्या आहेत व एकंदर बाजारांत येणाऱ्या भाजीपाल्याचें प्रमाणहि अत्यंत कमी झालें आहे. ह्यावर स्वावलंबनाचा उपाय म्हणून डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्या कांहीं सभासदांनीं पुणें येथील घरमालकांना तज्ज्ञ सल्ला व बीं-बियाणें, खतें व रोगनिवारक औषधें ह्यांच्या बाबतींत शक्य ती मदत देऊन घरोघर भाजीपाल्याचें उत्पादन करण्याची मोहीम सुरू केली आहे. ह्या मोहिमेच्या मदतीकरितां लागणारी माहिती अनायासें मुंबई सरकारच्या शेतकी खात्यानें १९४२ च्या चवथ्या पत्रकांत इंग्रजींत प्रसिद्ध केली आहे. त्या पत्रकाचें मराठींत रूपांतर करून "शेती आणि शेतकरी"च्या ताज्या अंकांत दिलें आहे. त्याशिवाय निरनिराळ्या हंगामांत कोणत्या भाज्या लावाव्यात व त्या किती दिवसांत तयार होतील ह्यासंबंधींची माहिती कांहीं वर्षांमागें शेतकी आणि शेतकरींत प्रसिद्ध झालेली पुन्हा परिशिष्ट २ म्हणून मुद्दाम दिली आहे. खेड्यांत रहाणाऱ्या लोकांनाहि ही माहिती उपयोगी पडेल. सध्यां खेडेगांवच्या लोकांना भाजीपाल्याची फारशी आवड नाहीं. परंतु लहान प्रमाणावर भाजीपाला लावण्याची माहिती त्यांनीं काळजीपूर्वक वाचून तिचा उपयोग केल्यास त्यांच्या आहारांत योग्य दिशेनें सुधारणा होऊन त्यांचें आरोग्य सुधारेल असा "शेतकी आणि शेतकरी"च्या संपादकांस भरंवसा वाटतो.

### आंबे व द्राक्षें ह्यांच्या झाडांवर गंधकाची पूड

मुंबई प्रांतांतील आंबे व द्राक्षें ह्यांच्या झाडांवर गंधकाची पूड उडविण्यासाठीं शेतकी खात्यानें ६० टन गंधक उपलब्ध केलें आहे. गरजू लोकांनीं सरकारच्या प्लँट-पॅथॉलॉजिस्ट (पुणें)कडे अर्ज करावेत.

### दुष्काळामुळें होणाऱ्या रोगांवर नवीन उपाय

" ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ " या संस्थेच्या मदतीनें वैद्यक खात्यांतील तज्ज्ञांनीं कलकत्त्यांत दुष्काळामुळें पसरलेल्या रोगांवर कांहीं नवीन उपाययोजना शोधून काढिल्या आहेत. त्यामुळें उपासमारीनें जर्जर झालेल्या रोग्यांचे आतड्याचे विकार शे. ९४ टक्के बरे झाले आहेत. ह्या निराश्रित लोकांमध्यें अतिसार व आंत्रदाह हे विकार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहेत असें दिसून आलें. पूर्वपरिचित उपायांनीं फारसा गुण आला नाहीं पण " सल्फा-ग्वानिडिन " हें ह्या रोगांवर फारच उपयोगी असल्याचें दिसून आलें. या रोग्यांना खाल्लेलें अन्न पचत नाहीं. ग्लूकोज शिरेंतून दिलें तर फक्त चार ते बारा तासच उपयोग होतो. पण पचनशक्ति सुधारेपर्यंत शिजविलेलें मांस व ग्लूकोज शिरेंतून दिल्यास फायदा होतो. या रोग्यांमध्यें नागव्रणाचे रोगी बरेच आढळतात. हा व्रण फार दुष्ट असून तो ज्या ठिकाणीं झाला असेल त्याच्या सभोवतालचा शरीरभाग तो त्वरेनें सडवितो, त्यामुळें रोग्याच्या जिवासहि धोका असतो. व्रणावरील सडका भाग काढून टाकून त्यावर " सल्फानिल-अमाइड " या द्रव्याची पूड टाकिली व रोग्यास सात्विक अन्न दिलें तर रोगी सुधारतो असें दिसून आलें आहे.

दुष्काळ-पीडित रोग्यांना सुरुवातीस बार्लीचें पाणी, साखर व लिंबाचा रस द्यावा लागतो. लहान मुलांना दूध, ब्रेड वगैरे असलेला आहार पथ्यकारक होतो. रोग्यांच्या प्रकृतिमानाप्रमाणें आहारांत फरक करण्यांत येतो.

---

### हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं हिंदी रेल्वेजचें १९४४-४५ सालचें अंदाजपत्रक पुढें मांडून त्यावर भाषण केलें. त्याचा रोख रेल्वेजचें वाढतें उत्पन्न, त्याची हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस होणारी अधिकाधिक मदत आणि त्याची मोठी युद्धोत्तर पुनर्घटना ह्यांच्या महत्त्वावर होता. खालीं दिलेल्या आंकड्यांवरून रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना येईल:—

( कोटि रुपये )

| | १९४३-४४ | अंदाज १९४४-४५ |
|---|---|---|
| उत्पन्न ... | १७८ | १९२ |
| एकूण खर्च ... | १०८ | ११४ |
| वाढावा ... | ४३ | ५२ |
| हिं. सरकारच्या उत्पन्नांत भर | ३२ | ३१ |
| तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या युद्धोत्तर सुखसोयींसाठी फंड ... | | १० |
| रिझर्व्ह ... | ११ | १० |

---

### सरकारी खात्यांतील लांचलुचपतीस आळा

युद्ध, पुरवठा व रेल्वे खात्यांत मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या लांचलुचपतीच्या व पैसेखाऊपणाच्या वाईट प्रवृत्तीची सरकारास जाणीव आहे व त्याचा प्रतिकार करण्यासाठीं सरकारनें खास पोलिस व्यवस्था केली आहे. त्यांनीं १९४३ मध्यें ४२९ प्रकरणांची चौकशी केली. महत्त्वाच्या प्रकरणांची विशेषकरून चौकशी करून विशेषतः वरिष्ठ अधिकाऱ्यांवर खटले भरण्याबद्दल सरकारनें सूचना दिलेली आहे. वरील माहिती श्री. त्रिवेदी ह्यांनीं असेंब्लींत सांगितली.


जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा-बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लॅंड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

| मुदत | | दर | |
|---|---|---|---|
| ६ | महिने | ४ | टक्के |
| १२ | " | ४॥ | " |
| २४ | " | ५ | " |

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

मांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. ६,८०,६५० | रु. ३,४०,३२५ |

एकूण खेळतें मांडवल रु. ७०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
| --- | --- | --- |
| अधिकृत मांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें मांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. सी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,०००-वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई



### दत्त कंपनी

७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.



## ५ वा आठवडा

ग्लोब–पुणें

प्रकाश पिक्चर्सचा प्रेक्षणीय बोलपट

एव्हरग्रीन रिलीज

# प न घ ट

: भूमिका :

रत्नमाला, उमाकांत, जीवन

रोज २ खेळ ६॥ व १० वाजतां बुध. ता. ८ गुरु. ता. ९ शुक्र. ता. १० रोजीं व शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां



## १९ वा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

# रामराज्य

दिग्दर्शक :—विजय भट्ट.

—: भूमिका :—

शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

## मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६॥ व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व बुध. ता. ८ गुरु. ९ व शुक्र. ता. १० रोजीं सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां

[ एव्हरग्रीन–रिलीज ]



## १२ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

# महात्मा विदुर

दिग्दर्शक :—पार्श्वनाथ आळतेकर

कला :—बाबुराव पेंटर

मु.—कै. पागनीस, दुर्गा खोटे, यांची एकत्र भूमिका असलेला भक्तिपट. मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद

## आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ दुपारीं ३, ६॥ व १० वाजतां


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.